दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ६९ बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# फलोत्पादन विभागाची जागा व्यापारी संकुलासाठी केज नग पंचायत कडे हस्तांतरीत.

**३५,वर्षा चा प्रश्न मार्गी केज वासियांची स्वप्न पुर्ती झाल्या बद्दल नागरिकांतून समाधान व्यक्त-हारुणभाई इनामदार,सिताताई बनसोड.**





केज/प्रतिनिधी :- केज शहरातील ३५ वर्षापासून रखडलेला व्यापारी संकुलाचा प्रश्न केज नगरपंचायत चे गटनेते हारुण इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांच्या अथक परिश्रमातून मार्गी लागल्यामुळे केजवासियां मधून आभार व्यक्त होत आहेत. केज नगरपंचायत मध्ये गटनेते, हारुन इनामदार व केज नगरपंचायत च्या विद्यमान अध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या नेत्रत्वाखाली केज शहरा चा विकास अगदी झपाट्याने होत असल्याचे दिसून येत असून केज शहरातील अत्यंत्य जुना व सर्वांच्या जिव्हाळ्या चा प्रश्न म्हणजे फलोत्पादन खात्यातील जागा व्यापारी संकुलासाठी मिळावी यासाठी मा. हारून इनामदार व नगराध्यक्षा मा. सौ. सिताताई बनसोड यांनी अथक परिश्रम करून मार्गी लावला असून राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी फलोत्पादन ( जिराईत खात्याची ) जागा व्यापारी संकुलास दिली असून तसे आदेश दिले आहेत त्यामुळे ३५ वर्षापासून प्रलंबीत असलेला व्यापारी, व्यावसाय धारक यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे केज शहरातील नागरीकातून मा. हारूनभाई इनामदार व नगराध्यक्षा मा. सौ. सिता ताई बनसोड यांचे आभार मानले आहेत, मा. हारून इनामदार व नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या नेतृत्वा खाली केज शहराचा विकास होत असून शहराचा चेहरा मोहरा बदलत असून व्यापारी संकुलाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे केज वासियांतून केज नगर पंचायत चे आभार व्यक्त होत आहेत. तसेच नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.

# पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त दिल्लीत सेवा पंधरवडा



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५ वा वाढदिवस खास बनवण्यासाठी दिल्ली सरकारकडून राजधानीत सेवा पंधरवडा सुरू केला जाणार आहे, ज्यामध्ये १५ मोठ्या प्रकल्कपांचे उदघाटन केले जाणार आहे. हे कार्यक्रम केवळ उत्सवाचा भाग नसून दिल्लीतील लोकांसाठी नवीन उपलब्धी देखील ठरणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह १७ सप्टेंबर रोजी त्यागराज स्टेडियममध्ये होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात उपस्थित राहतील. या दरम्यान ते १५ प्रकल्पांचे उद्घाटन करतील. यामध्ये नवीन रुग्णालय ब्लॉक, १०१ आरोग्य मंदिरे आणि १५० डायलिसिस केंद्रांचा समावेश आहे. असे मानले जाते की यामुळे आरोग्य सेवांना मोठी चालना मिळेल आणि लोकांना उपचारांसाठी जास्त वेळ वाट पाहावी लागणार नाही.
दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या कार्यक्रमासंदर्भात एक विशेष बैठक घेतली. प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा, भाजप खासदार आणि आमदार देखील उपस्थित होते. बैठकीत सेवा पंधरवडाच्या तयारीचा संपूर्ण आराखडा तयार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की हे कार्यक्रम दिल्लीच्या विकासाला एक नवी दिशा देतील. मुख्यमंत्री म्हणाल्या की १७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आणि १५ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात दिल्लीतील लोकांना दररोज एक नवी भेट मिळेल. म्हणजेच एक दिवस नवीन आरोग्य सुविधा आणि दुसऱ्या दिवशी नवीन विकास प्रकल्प. अशाप्रकारे, दिल्लीच्या वेगवेगळ्या भागात सलग १५ दिवस कार्यक्रम आणि उद्घाटने होतील. सेवा तंधरवडा अंतर्गत सुरू होणारी १०१ आरोग्य मंदिरे आणि १५० डायलिसिस केंद्रे विशेष चर्चेत आहेत. दिल्लीसारख्या मोठ्या शहरात डायलिसिस रुग्णांची संख्या खूप जास्त आहे. आता या नवीन केंद्रांमुळे हजारो लोकांना दिलासा मिळेल. त्याच वेळी, नवीन रुग्णालय ब्लॉकमधून रुग्णांना चांगले उपचार पर्याय मिळतील. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हे सर्व प्रकल्प दिल्लीला विकसित दिल्ली बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहेत.

## पत्रकार महामंडळ तात्काळ कार्यान्वित करा - नितीन जाधव यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कडे आग्रही मागणी.



हडपसर. पुणे /प्रतिनिधी :- जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हडपसर विधानसभा मतदारसंघात जनसंवाद दौरा उपक्रम सुरू आहे. याच जनसंवाद दौऱ्या दरम्यान हडपसर मांजरी येथे उपमुख्यमंत्री अजित पवार आले असता महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख नितीन जाधव यांनी मनःपूर्वक नमस्कार करून त्यांचे स्वागत केले . या वेळी जाधव यांनी पत्रकार महामंडळ तात्काळ कार्यान्वित करावे व पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी राज्यपाल कोट्यातून पत्रकार प्रतिनिधीला विधानपरिषदेवर संधी देण्याबाबत उपमुख्यमंत्री यांच्याकडे आग्रही भूमिका मांडत विनंती केली. यावेळी उपमुख्यमंत्री म्हणाले सध्याचे सरकार हे महायुतीचे आहे त्यामुळे मला एकट्याला महामंडळाबाबतचा निर्णय घेता येणार नाही मात्र मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत सदरच्या विषयाबाबत बोलून पुढील कार्यवाही केली जाईल तसेच राज्यपाल कोट्यातील पत्रकार प्रतिनिधीला विधान परिषदेवर संधी देण्याबाबतचा विषय वेगळा आहे राज्याचे राज्यपाल व एकूणच मंत्रिमंडळ सर्वच बाबी पडताळून नियम पाहून ठरवून हा निर्णय घेत असते असे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी आम्ही नेहमीच सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. सदरच्या जनसंवाद कार्यक्रम प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज चौक मांजरी बुद्रुक येथे हडपसर मतदार संघातील वरिष्ठ पदाधिकारी,कार्यकर्ते व अडीअडचणी घेऊन येणाऱ्या नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी हडपसर विधानसभेचे आमदार चेतन तुपे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश घुले, जि. प. माजी सदस्य दिलीप घुले. कात्रज दूध संघाचे माजी चेअरमन गोपाळ मस्के.युवकचे प्रदेश उपाध्यक्ष अजित घुले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष निलेश घुले. प्रशांत घुले. सोनाली अजिंक्य घुले. रुपेश तुपे. ॲड गौरव मस्के. अशोक शिंदे. ॲड शैलेश मस्के. आदी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संपादकीय

## अरे, पुन्हा लढाया पेटवा मशाली!

नागरिकांशी सर्वात जवळचे संबंध असलेल्या महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका लवकरच होऊ घातल्या आहेत. वर्षाच्या विलंबाने होणार्या या निवडणुकांसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. मृणालिनी नानिवडेकर राजकीय पक्षांची विचारशक्ती आणि मनोवृत्ती जिंकायचे कसे यातच गुंतली असते. दुर्दैवाने नागरिकांचा विकास साधतानाही सर्वात महत्त्वाचा निकष असतो तो आपला पक्ष कशामुळे जिंकेल? आणि प्रतिपक्षाचे नुकसान कशामुळे होईल? जिंकणे या उद्देशाभोवती फिरणार्या राजकीय पक्षांची धाव त्यामुळे अर्थातच निवडणुकीपासून निवडणुकीपर्यंत असते. गेल्यावेळी काय नुकसान झाले याचे हिशेब बांधत नव्याने बांधणी केली जाते. त्या हेतूने सभा-संमेलने घेतली जातात, मोर्चे ठरवले जातात. भेटीगाठींचा उद्देशही तोच असतो. महाराष्ट्रातल्या लांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची वॉर्डरचना प्रक्रिया जवळपास पूर्ण होत आहे. जिल्हा परिषद निवडणुकीतील आरक्षणे पडली आहेत. निवडणुकांचा हंगाम सुरू झाला आहे आणि पुन्हा राजकीय पक्ष हलू लागले आहेत.

भाजप कायम निवडणुकीला सामोरे जाण्यास सज्ज असतो. कार्यकर्ते सतत कोणत्या ना कोणत्या मोहिमेत गुंतलेले असतात. पक्षबांधणीत झोकून देतात सगळे. बाहेरचे आले, लाभार्थी झाले तरी जुने पक्षवाढीसाठी श्रमत असतातच. बैठका, रचना, नव्या चेहर्यांना संधी सगळे यथासांग सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांचा मेळावा नाशिकला झाला. गाठीला आमदार नसलेला तो पक्षही काही ना काही करत असतो. मात्र आता बाकी पक्षही कामाला लागले आहेत. उद्धव ठाकरे यांचे कार्यक्रम वाढले आहेत. आदित्य ठाकरेही ठिकठिकाणी मेळावे घेत आहेत.

मुंबई राखण्याचे शिवधनुष्य उचलायचे आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत शिवसेना उबाठाची मते फुटल्याची चर्चा पक्षाविरोधात माध्यमात मोहोळ उठवू शकेल हे लक्षात घेत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एका दिवसही वेळ न दवडता अवचित, अचानक एकेकाळी रुसलेल्या चुलतभावाची राज ठाकरे यांची शिवतीर्थावर जाऊन भेट घेतली आणि दोघे बंधू एकत्र येतील का या चर्चेने मतफुटीची चर्चा दूर कोपर्यात ढकलून दिली. शिवसेनेने २०१७ साली जिंकलेले वॉर्ड पूर्वी २०१३ साली मनसेकडे होते.

त्यामुळे या जागा राज ठाकरे यांनी मागितल्या तर उद्धव ठाकरे त्या देणार आहेत का? देणारच असतील तर त्या त्यागामुळे शिवसेना उबाठाला नेमका किती फायदा होणार याचे कोष्टक तयार आहे का? दोघेही भाऊ आपापल्या कार्यकर्त्यांना सगळ्या जागा लढायच्या तयारीत राहा, असेच आजही सांगताहेत. राज ठाकरे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटताहेत, एकनाथ शिंदे यांच्यावर आरोप करून गणपती दर्शनानिमित्त उभयपक्षी भेटीगाठी सुरू आहेत. त्यामुळे भावबंधन होतेय का ते पाहावे लागेल. चित्र आशादायी आहे. मराठी माणूस त्यामुळे खूश होणार आहे. नाशिकात संयुक्त मोर्चाही गाजला आहे. पण एकत्र जागावाटप होतेय की नाही ते कळायला जरा वेळच आहे. बघू काय होतेय ते ! काँग्रेस सर्वाधिक खासदार असलेला पक्ष काय करतोय ते अजून कळत नाहीये. वडेट्टीवार वगैरे नेते मात्र जोरात आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसने शरद पवार यांच्या नेतृत्वात नाशिकात शेतकर्यांच्या आक्रोशाचा विषय हाती घेतला. आत्महत्यांची संख्या वाढत आहे. स्वत: शरद पवार कृषिमंत्री असतानाही ही संख्या घटली नव्हती, उत्तर शोधता आले नव्हते. देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि पुन्हा देवेंद्र फडणवीस असा कोणताही मुख्यमंत्री त्यात घट नोंदवू शकलेला नाही. शेतीची जाण असलेल्या शरद पवार यांच्याकडे त्यावर तोडगा नव्हता. त्यामुळे ते पुढच्या पिढीतल्या मुख्यमंत्र्यांना याबद्दल सल्ला देऊ शकले नाहीत. आता हुशार राजकारणाचा परिचय देत ते शेतकरी आक्रोश ग्रामीण निवडणुकांच्या निमित्ताने जागवू पाहताहेत. सरकारने संभाव्य धोका लक्षात घेत शेतकरी योजनेचा निधी खात्यात जमा केला आहे. ही मलमपट्टी पुरेशी आहे का, याचा विचार नियोजनकार करतील. करायलाच हवा. सध्या मोर्चे मात्र मोठे काढायचे प्रयत्न सुरू आहेत. रोहित पवार हे तरुण नेते. दोन टर्म आमदार. ते थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना आव्हान देतात. तरुण मतदारांना ते आपले वाटतात का हे निवडणुकांत कळेल. अजित पवार यांचे आमदार संख्येने जास्त, पण मते शरद पवार यांच्याकडे अधिक. चिन्ह कुणाचे हा मुद्दा अद्याप अनिर्णीत.

जिल्हा परिषद, पंचायत समितीत आपले सहकारी परततील, असे शरद पवार यांना वाटते म्हणतात. ते निकराची लढाई लढायची तयारी कशी करतात, यावर पश्चिम महाराष्ट्राचे राजकारण अवलंबून असेल. पुणे, सातारा, सोलापूर हे जिल्हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रभावातले. तेथे आता भाजपने जोरदार प्रवेश केला आहे. उदयनराजे, शिवेंद्रराजे, जयकुमार गोरे, गोपीचंद पडळकर अशी सर्व नेतेमंडळी समवेत आहेत. सांगली जिल्ह्यातले उदाहरण महत्त्वाचे मानले तर सुधीर गाडगीळ विजयी आमदार; पण पृथ्वीराज पाटील, जयश्रीताई पाटील असे क्रमांक दोन-तीनवरचे पराभूतही भाजपत प्रवेशले आहेत. पुणे जिल्ह्यातले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दुसर्या राष्ट्रवादीकडे न जाता थेट भाजपत आले आहेत. विदर्भ भाजपचा गड. तेथे विरोध करू शकेल काँग्रेस. पण ते शांत दिसताहेत किंवा रणनीती कळत नाहीये. कोकणात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण जोरदार फिरताहेत. मराठवाड्यातही पाय रोवणे सुरू आहे. पूर्वी मराठवाडा सेनेसमवेत असे. उत्तर महाराष्ट्रात तर भाजपने जिंकणे या एकमेव उद्देशाने वादग्रस्तांनाही प्रवेश दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सेवाकार्यात हजारोंशी संपर्क करणे सुरू आहे. भाजप या निवडणुका जोरात लढणार, शत-प्रतिशतच्या दिशेने पावले टाकणार, अशी शक्यता दिसतेय. भाजप शिवसेना शिंदे गटाला व अजित पवार यांच्या पक्षाला महापालिकेत किती जागा देतो, समवेत ठेवतो का हेही कळेल.

# भुके नाही अन्न मेल्यावर पिंडदान

परवाच पितृपंधरवडा बाबत एक व्हिडिओ पाहायला मिळाला. कोणी एक महिला आपल्या छोट्या मुलाला म्हणते पटकन जेवण करून घे. आज गोड खीर केलेली आहे. तो म्हटला की ,आज विशेष काय आहे .तर ती म्हटली आज तुझ्या आजीचा स्मृतिदिन आहे. म्हणून त्यांना आवडणारी खीर केलेली आहे. तो मुलगा म्हटला आजी जिवंत असताना तिचा राग राग करीत होतीस. एकदा तर आजीला मी दिलेली मटारपनिरची भाजीची वाटी तू आजीच्या ताटातून काढून घेऊन तिला दुसरी शिळी भाजी दिलेली होती. माझ्या लक्षात आहे. मी बोललो तर तू माझ्यावर रागावली होतीस.

आज आजी हयात नसताना ती काय तू केलेली खीर खायला येणार आहे का ? नको मला तू केलेली खीर मला आज जेवायचं नाही. मी मोठा झाल्यावर असाच तुमच्याशी वागेन. असाच एक सप्टेंबर २०२२ मध्ये समाज माध्यमावर एक लेख डॉ.श्रीमंत कोकाटे सर यांचा लेख वाचण्यात आलेला होता तो असा पितृपंधरवडा, मृत्यूनंतर पिंडदान ,केस कापणे मूर्खपणा ..सजीवांची निर्मिती नैसर्गिक प्रक्रियेतून झालेली आहे. त्याला ईश्वराने निर्माण केलेले नाही असे मानवशास्त्रज्ञ (-पींीश्रिसळीीं) सांगतात . मृत्यूनंतर तो स्वर्गातएक नरकात किंवा वैकुंठात जात नाही ,तर त्याचे पृथ्वीवरच विघटन होते.

महान दार्शनिक चार्वाक , महावीर, गौतम बुद्ध, संत तुकाराम महाराज फुले ,शाहू ,आंबेडकरांनी स्वर्ग ,नरक , वैकुंठ ,आत्मा, पूर्वजन्म इत्यादी बाबी नाकारलेल्या आहेत. चार्वाक ,महावीर आणि बुद्ध हे महामानव अनित्यवादी ,अनात्मवादी आणि निरीश्वरवादी होते. गरिबांना स्वर्गाचे आमिष आणि श्रीमंताना नरकाची भीती दाखवून लुटण्यासाठी स्वार्थी लोकांनी स्वर्ग ,नरक ,आत्मा या खोटारड्या बाबी निर्माण केल्या. संत तुकाराम महाराज म्हणतात. येथे मिळतो दहीभात वैकुंठी नाही त्याची मात काबाडकष्ट केले तर पृथ्वीवर दहिभात, चटणी भाकरी मिळेल आपल्याला जे स्वर्गातील कामधेनु ,कल्पवृक्ष , चिंतामणी सांगितले जातात ते पूर्णतः काल्पनिक आहे.

हे सांगण्यामागे खोटारडेपणा आहे. संत तुकाराम महाराज सांगतात ' प्रयत्न करा ,कष्ट करा. कामधेनू, कल्पवृक्ष , चिंतामणी या काल्पनिक गोष्टीच्या मागे धावू नका . पुढे ते सांगतात.

भय नाही जन्म घेता श्र मोक्ष पदा हाणी लाथा
तुका म्हणे आता श्र मज न लगे सायुज्यता श्रश्र

संत तुकाराम महाराज म्हणतात या जन्माची मला भीती नाही .किती तरी संकटे आली तरी मी त्याच्या वरती मात करीन. गरीबी आली तरी मी मागे हटणार नाही. या जन्माची मला भीती नाही. किती जरी संकटे आली तरी मी त्याच्यावर मात करीन. संकटाने मी नाउमेद होणार नाही. या जन्माची मला भीती नाही. मला मोक्ष नको. मोक्षाला लाथा घाला. मोक्षातील अतिउच्चपद संयोज्यता हे पद देखील मला नको. समिपता, सलोखता , सलिलता, आणि सायुज्यता हे मोक्षाचे चार प्रकार सांगितले जातात. त्यातील सायुज्यता हा मोक्षाचा अतिउच्च प्रकार आहे. त्या मोक्षाला लाथा घाला. तो मोक्ष मला नको. मला पृथ्वीवरील संघर्षमय असेल, अनुकूल किंवा प्रतिकूल जीवन असेल तेच मला आवडते असे संत तुकाराम महाराज निक्षून सांगतात.

वरील अभंगावरुन स्पष्ट स्पष्ट होते की , संत तुकाराम महाराज हे स्वर्ग नरक नाकारणारे होते. संत तुकाराम महाराज म्हणतात ' मृत्यूनंतर पिंडदान ,तेरवी पितृपंधरावडा करण्यापेक्षा जिवंतपणी आई- वडिलांना सांभाळा त्यांचा आदर सन्मान करा.

भुके नाही अन्न मेल्यावरी पिंडदान श्र
हे तो चाळवा चाळवी केले आपणच जेवी श्रश्र

आपल्या वडिलांचे निधन झाल्या नंतर आपण तेरवी करतो. पिंडदान करतो. केस कापतो. नैवेद्य दाखवतो आणि नैवेद्य खाण्यासाठी कावळ्याची वाट पाहतो. आपले आई-वडील कावळे होते काय ? कावळ्याची पर्सनॅलिटी आणि आपल्या आई वडिलाची पर्सनॅलिटी कुठेतरी साम्य आहे का ?

कोणी केला आपल्या आई-वडिलांचा कावळा ? याबद्दल चीड यायला हवी . ती चीड संत तुकाराम महाराजांना आली. एका कावळ्याने घास शिवला तर आपण समजू शकतो. चार-पाच कावळ्यांनी घास शिवला तर याचा अर्थ काय घ्यायचा ? ही आपल्या माता माऊल्यांची बदनामी नाही काय ? म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात.

तुका म्हणे मायबापे श्र अवघी देवाचीच रूपे
आई वडील तुझ्यापाशी कशाला करतोकाशीश्रश्र

आई वडील हे सर्वात मोठे दैवत आहे. त्यांची सेवा करणे ,आदर सन्मान करणे, त्यांना जिवंतपणी उत्तम प्रकारे सांभाळणे ही खरी भक्ती आहे. आई-वडील हे काशी पेक्षाही सर्वात मोठे तीर्थक्षेत्र आहे.

काशी हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे . त्याबद्दल जरूर श्रद्धा बाळगावी. परंतु काशीला गेल्यानंतर तेथे स्नान केल्यानंतर पाप क्षालन होते आणि पुण्यप्राप्ती होते असे समजणे अज्ञानपणाचे आहे . आई-वडिलांची सेवा हेच खरे पुण्य आहे. घरी आई-वडील सोडून तीर्थयात्रा करणे पुण्यप्राप्तीसाठी काशीला जाणे , मृत्यूनंतर पिंडदान करणे ,कावळ्याला वाडवडील समजून नैवेद्य दाखविणे , केस कापणे मूर्खपणा आहे. दिवंगत पितरा बद्दल जरूर आदर बाळगावा, त्यांच्या प्रतिमांचे पूजन करावे .परंतु ते स्वर्गातून खाली येणार आहे असे समजणे अज्ञानपणाचेआहे .पितृदोष असल्याचे सांगून नारायण नागबळी विधी करून पैसा उकळणे हा धर्माच्या नावाखाली टाकलेला धार्मिक दरोडा आहे.- डॉ .श्रीमंत कोकाटे.

या ठिकाणी समाजमाध्यमावर सप्टेंबर २०२२ मध्ये वाचलेली पितृपक्ष कविता आठवली ती अशी आहे.

वडिलांचं रूप घेऊन कावळा घरी आला ताटातील मेनू पाहून बोलाव वाटलं त्याला. बरं नव्हतं तेव्हा कधीच आणली नाहीस गोळी आज कशाला वाढतो रे ताटात पुरणाची पोळी विनाकारण भांडण होता दिसलेखरेरूप तुझी कशाला वाढतो पात्रावर वडे आणि भजी प्रेम नाही जिव्हाळा नव्हता नाही दिलीस साथ आज कशाला वाढतो रे पात्रावर वरण-भात जबरदस्ती अंगठा घेऊन केली घराची वाटणी कशाला वाटतो पात्रावर आज लोणचं चटणी हिस्सा वाटणीसाठी केली बहिणी संगे दूरी आता काय उपयोग वाढून पात्रावरती पुरी आयुष्यभर ठेवली रे माझ्या बद्दल अढी

आता कोण पिणार ती द्रोणा मधली कढी वेगळा राहिलो तेव्हा नाही दिलास मला धीर आज कशाला वाढतो तू पात्रावरती खीर सदासुदीला आणलं नाही मला नवं कापड आता कशाला वाढतोय कुरडई आणि पापड आजारी असताना तू धुतली ना सतरंजी आता कशाला वाढतो रे पात्रावर करंजी जिवंत असताना पोरा दिले असतेस लक्ष

तृप्त झाले असते पूर्वज नसता पितृपक्ष पितरांचा मिळून तयार होतो पितृपक्ष बऱ्याच घरात आज मात्र झाला विरोधी पक्ष सांगतोय तू रहा सदैव जेष्ठाप्रति दक्ष करावं तसं भरावे लागेल इतिहास देईल साक्ष मातृपितृ देवो भव.

वरील सर्व कथानावरून संत तुकाराम महाराज म्हणतात भुके नाही अन्न मेल्यावर पिंडदान

********

लेखक
जी.एस. कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न.७५८८५६०७६१

# व्यक्तिगत जीवनाचा अधिकार

'ब्लॅकमेलिंग'चा प्रकार व्यक्तीच्या खासगी जीवनाशी निगडित असल्यामुळे व्यक्तीच्या खासगी आयुष्याकडे गांभीर्यपूर्वक पाहणे आवश्यक असते.

ब्लॅकमेलिंग हा फक्त गुन्ह्याचा एक प्रकार आहे. जो पीडित व्यक्तीच्या खासगी आयुष्यावर घाला घालतो. ब्लॅकमेलिंगसारखे अनेक गुन्हे हे भारतीय न्याय संहिता, २०२३ आणि माहिती व तंत्रज्ञान (दुरुस्ती) अधिनियम, २००८ अंतर्गत विविध कलमांखाली दंडनीय अपराध आहेत. परंतु, खासगीपणाच्या अधिकाराला जेव्हा घटनात्मक स्वरूप प्राप्त होते तेव्हा त्याचे महत्त्व हे अधिक असते.

स्वतंत्र भारतात लोकांना सन्मानाने आणि कोणत्याही भीतीशिवाय जगता आले पाहिजे या उद्देशाने भारतीय राज्यघटनेने नागरिकांना अनेक अधिकार दिले आहेत. सर्वसाधारणपणे त्यांना मूलभूत अधिकार असे म्हटले जाते.

उदाहरणार्थ, समतेचा अधिकार, व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार, आपल्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार इत्यादी. परंतु, व्यक्तिगत जीवनाचा किंवा गोपनीयतेचा अधिकार हा मूळ भारतीय राज्यघटनेमध्ये कोठेही असल्याचे दिसून येत नाही. २०१७ मध्ये न्या. के. एस. पुट्टास्वामी (निवृत्त) वि. भारतीय संघराज्य खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'व्यक्तिगत जीवनाचा अधिकार' हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार असून राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत आता व्यक्तीच्या सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकाराचा एक भाग असल्याचे स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे नागरिकांच्या जीवनातील खासगीपणा हा आता नागरिकांचा घटनात्मक अधिकार झाला आहे. व्यक्तिगत जीवनाचा अधिकार हा व्यक्तीचे खासगी जीवन सार्वजनिक करण्याच्या सर्व प्रकारच्या कृत्यांना आळा घालतो. त्यामुळे नागरिकांच्या व्यक्तिगत आयुष्याचे रक्षण होते.

भारतीय राज्यघटना स्वीकृत झाल्यापासून ते न्या. के. एस. पुट्टास्वामी (निवृत्त) खटल्याचा निकाल येईपर्यंत सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांमध्ये आयुष्यातील गोपनीयता आणि व्यक्तिगत जीवनाच्या अधिकारासंदर्भात अनेक खटले आले होते. परंतु, ह्या अधिकारांना सुरुवातीच्या काळात घटनात्मक स्वरूप मात्र प्राप्त होऊ शकले नाही. न्या. के. एस. पुट्टास्वामी (निवृत्त) हे स्वतः कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राहिल्यामुळे आणि कायद्याचा गाढा अभ्यास असल्यामुळे त्यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर जे मुद्दे मांडले त्याचाच परिपाक म्हणून आज व्यक्तिगत जीवनाचा अधिकार हा व्यक्तीचा मूलभूत अधिकार बनला आहे.

गोपनीयता आणि व्यक्तिगत जीवनाच्या अधिकारांवर प्रकाश टाकणारे महत्त्वपूर्ण खटले पुढीलप्रमाणे

१. एम. पी शर्मा वि. सतीश चंद्रा, १९५४ : गोपनीयता आणि व्यक्तिगत जीवनाच्या अधिकारांसदर्भात चर्चेत आलेला स्वतंत्र भारतातील हा पहिला मोठा खटला होता. सदर खटला हा दालमिया ग्रुप ऑफ कंपनीज ह्यांच्याकडून दाखल केला गेला होता. १९५४ मध्ये केंद्र सरकारकडे अशा अनेक तक्रारी आल्या होत्या की दालमिया ग्रुप आपल्या कंपन्यांचा नफा वाढविण्यासाठी कागदपत्रांध्ये फेरफार आणि नकली कागदपत्रे सरकार दरबारी जमा करीत आहे.

केंद्र सरकारने ह्या आरोपांची गंभीर दखल घेतली. दालमिया ग्रुप ऑफ कंपनीज विरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांच्या विरोधात शोध आणि जप्तीचे वॉरंट जारी केले. वॉरंट जारी झाल्यानंतर तातडीने पोलिसांनी एकाचवेळी दालमिया ग्रुपच्या देशभरातील तीसपेक्षा अधिक ठिकाणांवर छापे मारून जप्तीची कारवाई सुरू केली.

दुसरीकडे, दालमिया ग्रुपने आमच्या विरोधात शोध आणि जप्तीची कारवाई करीत असताना सरकारकडून आमच्या खासगी मालमत्ता आणि कागदपत्रांची तपासणी होत असल्याचा आरोप करीत सर्वोच्च न्यायालयात घटनेच्या कलम ३२ अन्वये धाव घेतली.

सदर खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाच्या ८ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, समाजाच्या सुरक्षेसाठी आणि देशात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारकडे छापेमारी आणि जप्तीचे विशेष अधिकार आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये व्यक्तिगत जीवनाचा अधिकार नावाचा कोणताही अधिकार नसल्यामुळे सरकारला दालमिया ग्रुप विरोधातील कारवाईपासून रोखता येणार नाही. थोडक्यात, १९५४ ह्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने व्यक्तिगत जीवनाचा अधिकार मान्य करण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला.

२. खडक सिंग वि. उत्तर प्रदेश राज्य, १९६२ : उत्तर प्रदेश, राजस्थान आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेले चंबळ खोरे हे सुरुवातीपासूनच डाकू आणि दरोडेखोरांचे नंदनवन मानले जाते. एका अशाच दरोड्याच्या गुन्ह्याचा तपास करताना उत्तर प्रदेश पोलिसाकडून खडक सिंग नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतले जाते.

खडक सिंग विरोधात न्यायालयात गुन्हा सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुरावे उपलब्ध नसल्यामुळे आणि खडक सिंगला जर मोकळे सोडले तर गुन्ह्याची उकल होऊ शकेल ह्या हेतूने पोलिसांकडून त्याला जुजबी चौकशी करून सोडून दिले जाते.

मात्र हे करीत असताना उत्तर प्रदेश पोलीस खडक सिंग विरोधात यूपी पोलीस रेग्युलेशन नावाचे नियम लावतात. ह्या नियमांमुळे उत्तर प्रदेश पोलिसांना खडक सिंगवर पाळत ठेवण्याचा, त्याला भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीला संशयित आरोपी म्हणून ताब्यात घेण्याचा, चौकशीसाठी रात्री अपरात्री पोलीस ठाण्यात बोलविण्याचा अधिकार प्राप्त झाला.

उत्तर प्रदेश पोलिसांच्या सततच्या पाळत ठेवण्याला आणि रात्र अपरात्री घरी चौकशीसाठी येण्याच्या त्रासाला कंटाळून खडक सिंगने दालमिया ग्रुप प्रमाणेच आपल्या व्यक्तिगत जीवनाच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित करीत सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठाविले.

सदर खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाच्या ६ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, रात्री अपरात्री उत्तर प्रदेश पोलिसांकडून खडक सिंगच्या घराची झडती बेकायदेशीर असली, तरी भारतीय राज्यघटनेत गोपनीयता व व्यक्तिगत जीवनाचा अधिकार नावाचा कोणताही अधिकार अस्तित्वात नाही.

३. न्या. के. एस. पुट्टास्वामी (निवृत्त) वि. भारतीय संघराज्य, २०१७ : सदर खटला हा 'आधार कार्ड खटला' म्हणून ओळखला जातो. आधार कार्ड हे बँक खात्यांसह इतर सर्व ठिकाणी लिंक करण्याच्या केंद्र सरकारच्या देशव्यापी मोहिमेविरोधात न्या. के. एस. पुट्टास्वामी (निवृत्त) ह्यांनी व्यक्तिगत जीवनाचा आधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

न्या. पुट्टास्वामी ह्यांचा तर्क होता की, आधार सर्व ठिकाणी लिंक केल्यामुळे नागरिकांचे व्यक्तिगत जीवन हे धोक्यात आले आहे. सरकार आधार क्रमांकाच्या मदतीने कधीही कोणाचीही कोणतीही माहिती काढू शकते. न्यायालयात सरकारच्या वतीने युक्तिवाद करताना ॲटर्नी जनरल ह्यांनी एम. पी शर्मा आणि खडक सिंग खटल्याचा संदर्भ देत व्यक्तिगत जीवनाचा अधिकार राज्यघटनेत नसल्याचे स्पष्ट केले.

एम. पी शर्मा खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाच्या ८ न्यायमूर्तींचे खंडपीठ बसले होते, तर खडक सिंगच्या खटल्यात ६ न्यायमूर्तींचे खंडपीठ होते. त्यामुळे वरील दोन खटल्यांचे निर्णय जर फिरवायचे असतील तर ८ पेक्षा जास्त न्यायमूर्तींचे खंडपीठ बसणे आवश्यक होते.

शेवटी आपला ऐतिहासिक निर्णय देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या ९ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने न्या. पुट्टास्वामी ह्यांचा दावा मान्य करीत व्यक्तिगत जीवनाचा अधिकार कोणत्याही व्यक्तीच्या सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकाराचा अविभाज्य भाग असल्याचे मान्य करत त्याचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत केला.

२०१७ च्या न्या. पुट्टास्वामी खटल्यानंतर देशाचा विविध उच्च न्यायालयांनी फोन टॅपिंगपासून ते पाळत ठेवण्यापर्यंत अनेक खटल्यांमध्ये पुट्टास्वामी खटल्याचा संदर्भ देत व्यक्तींच्या व्यक्तिगत जीवनाच्या अधिकाराचे रक्षण केले.

व्यक्तिगत जीवनाचा अधिकार हा कोण्या एका यंत्रणा किंवा सरकार विरोधात नसून प्रत्येक व्यक्ती विरोधात आहे जी व्यक्ती इतरांच्या व्यक्तिगत जीवनात लुडबुड करण्याचा प्रयत्न करते. प्रत्येकाचे व्यक्तिगत जीवन हे अमूल्य असून त्यामध्ये डोकविण्याचा कोणालाही अधिकार नाही हे यांवरून स्पष्ट होते.

# सावधानता गरजेची

भारताचा शेजारी देश नेपाळ धुमसतो आहे. युवकांची हिंसक निदर्शने सुरू आहेत. त्यांचा आक्रोश पाहून पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी राजीनामा दिला. निदर्शनांच्या पहिल्या दिवशी स्थिती एवढी गंभीर होती की राजकीय नेत्यांना रस्त्यावर पळवून मारहाण केली गेली. त्यात नेपाळचे माजी पंतप्रधान देऊबा, मंत्रिमंडळातील आताचे मंत्री आणि इतर नेत्यांचा समावेश होता. एका बड्या नेत्याच्या पत्नीचा मृत्यू झाला. ओली यांनी गुरुवारी त्यांचा ठावठिकाणा सांगितला. गेले तीन दिवस ते अज्ञातवासात होते. पंधरा हजार कैद्यांनी देशातील स्थितीचा लाभ घेत तुरुंगातून पलायन केले आहे. काही जणांना पकडल्याचा दावा केला गेला. तो खरा मानावा अशी नेपाळमधील स्थिती नाही. स्वत:च्या देशात काही अराजक निर्माण झाले की शेजारी देशात जाण्याचा नागरिकांचा कल असतो. जगातल्या या भागाची स्थिती पाहता नेपाळ असो किंवा अन्य शेजारी देश, तेथील लोकांची पावले भारताकडे वळतात. नेपाळमध्ये स्थैर्य जेव्हा केव्हा निर्माण होईल तोपर्यंत भारताला सावध रहावे लागेल. राजेशाही संपुष्टात आल्यानंतर नेपाळमध्ये लोकशाही नावालाच अस्तित्वात आली. असे अनेक देश आणि तेथील नागरिक आहेत त्यांच्या दृष्टीने निवडणुका आणि त्यानिमित्ताने होणारा गाजावाजा हीच लोकशाही असते. भारताच्या शेजारी नजर टाकली तर हेच चित्र दिसते. राजेशाही राजवट संपल्यानंतर नेपाळमध्ये लोकशाहीच्या प्रती राज्यकर्ते गंभीर असल्याचे फारसे जाणवले नाही. सततच्या राजकीय कुरघोड्या आणि सत्तांतरे होत राहिली. आता झालेली निदर्शने सोशल मीडियावरील बंदीमुळे सुरू झाली हे एक कारण सांगितले गेले. मात्र बंदी उठवल्यानंतरही जनक्षोभ शांत होत नाही याचा अर्थ आक्रोशाचे ते एकमेव कारण नव्हते. रस्त्यावर उतरलेल्या तरूणांनी भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला. मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. ओली यांच्या गच्छंतीनंतर सगळे शांत होईल ही अपेक्षा होती. तेही झाले नाही. या देशाचे राजकीय भविष्य काय असेल ते समजण्यासाठी काही काळ वाट पाहावी लागेल. बांगलादेशात असेच घडले होते. आरक्षणाच्या विषयावर विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. ते प्रचंड पेटले, एवढे की पंतप्रधान शेख हसीना यांना पळ काढून भारतात आश्रय घ्यावा लागला. गेल्या वर्षभरापासून बांगलादेश विस्कटलेलाच आहे. आंदोलनांत कथित क्रांतिकारक क्रांती करतात, व्यापारी व्यापार करतात आणि सत्ताधारी सत्ताकारण करतात. होरपळली जाते ती सर्वसामान्य जनता. त्यांना महागाईचा सामना करावाच लागतो. त्यांनी जे कष्टाने उभे केले असते तेही अचानक वणव्यासारख्या पसरलेल्या हिंसाचारात गमावले असते. ते एका रात्रीत किंवा अवघ्या काही तासांत बेघर होतात, उघडे पडतात. अफगाणिस्तानातही चार वर्षांपूर्वी उलथापालथ झाली. १५ ऑगस्ट २०२१ रोजी तालिबानने अत्यंत वेगाने अफगाण सरकारवर ताबा मिळवला. तेव्हाही राष्ट्रपतींच्या निवासस्थानात घुसून लुटालूट झाली, रस्त्यांवर गोळीबार झाला. तेथे तळ ठोकून बसलेल्या अमेरिकेने अचानक काढता पाय घेतल्यामुळे हे सगळे घडले. आजही तेथे शाश्वत आणि कल्याणकारी राज्यव्यवस्था नाही. अफगाणनंतर ९ जुलै २०२२ रोजी श्रीलंकेतील नागरिक अनियंत्रित झाले. त्यांनीही राष्ट्रपती भवनावर चाल केली आणि गोटाबाया राजपक्षेंना राजीनामा द्यावा लागला. संपूर्ण राजपक्षे कुटुंबाला परागंदा व्हावे लागले. भारताच्या मदतीने आणि काही तेथील नागरिकांच्या सुज्ञतेने श्रीलंकेत स्थिती फार हाताबाहेर गेली नाही. अफगाणिस्तानात तालिबानने तख्तपालट केले. त्यांचा विषय वेगळा. बांगलादेश, श्रीलंका आणि नेपाळमध्ये दोन गोष्टींचे साम्य आहे. एकतर हे भारताचे शेजारी आहेत. इतिहासकाळापासून त्यांचे भारताशी संबंध आहेत. दुसरे या देशांमध्ये केवळ आठवडाभराच्या किंवा फारतर पंधरवड्यात झालेल्या आंदोलनामुळे राज्यव्यवस्था कोलमडली. नेत्यांचे विलासी जीवन, भ्रष्टाचार आणि सत्तेसाठी केल्या जाणार्या तत्त्वहीन तडजोडी ही त्यामागची कारणे असू शकतात. गेल्या चार वर्षांत आपण हा सर्व घटनाक्रम पाहिला. या देशांमधील घटना अत्यंत वेगाने घडल्या असल्या तरी त्यामागे वर्षानुवर्षे असलेली खदखद नक्कीच कारणीभूत आहे. तथापि, आणखी एक तर्क काढला जातो आहे. कोणतेही आंदोलन एका पंधरवड्यात एवढे व्यापक होत नाही. एवढे अनियंत्रित होत नाही आणि सत्तांतरे व्हावीत असेही इतक्या कमी कालावधीत घडत नाही. भारतासह जगातल्या बर्याच देशांत अशी आंदोलने झाली. फ्रान्समध्येही आता आंदोलन सुरू आहे. मात्र जगाच्या एका विशिष्ट भागातच होणारी आंदोलने एवढी शक्तिशाली कशी होत आहेत की त्यामुळे तख्तपालटच होतो? जनमत तयार करणे, लोकांना जागृत करणे, त्याकरता त्यांच्याशी नियमित व्यवस्थेद्वारे संपर्कात असणे आणि त्यानंतर परिवर्तनाची हाक देणे असा सर्वसाधारण कोणत्याही आंदोलनाचा मार्ग असतो. मुळात विद्यमान राजवटीबद्दल तेवढी चीडही असावी लागते. त्यातूनच लोकशाही मार्गाने सत्ताबदल होतो.

# अतिवृष्टी पावसामुळे केज तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला तर सोयाबीन पीकाचे मोठे नुकसान

केज/प्रतिनिधी केज तालुक्यात ढगफुटी होवून अतिवृष्टी मुसळधार पाऊस झाला रात्री आणि सकाळी सतत मुसळधार पावसामुळे नदी ओढयाला महापुराचे स्वरूप आले होते. त्यामुळे केज तालुक्यातील मस्साजोग ते काळेगाव घाट रस्ता बंद पडला त्यामुळे सरकारी कर्मचारी, शाळकरी मुले, गावकरी दुपार पर्यंत अडकून पडले होते. तसेच केज ते विडा मार्गावरील रस्तयावरील पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे सकाळी शाळेला जाणारे कानडीमाळी साबला , धर्माळा , तरनळी , कोल्हेवाडी , नागझरी , लव्हुरी , येवता अशा अनेक पुढील गावात जाणारे कर्मचारी वर्ग पुलावर होते. केज तालुक्यामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे सोयाबीन , पीक कापणीला आलेले होते तेही ढगफुटी पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले शेतातून पुरासारखे पाणी वाहत होते पुराचे पाणी शेतातून वाहत होते त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. सोयाबीन हे मुख्य पीक आहे काळेगाव घाट गावासह आरणगाव ,ह.पिंपरी, बोरगाव,केळगाव,बेलगाव ,वरपगाव, जाधव जवळ, इत्यादी सह केज तालुक्यात मुसळधार



पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले तरी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रेचे लातूरहुन छत्रपती संभाजी नगरकडे प्रस्थान



लातूर:- तुळजापूरहून छत्रपती संभाजी नगर कडे निघालेल्या मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रेचे काल संध्याकाळी ७-०० वाजता लातूर येथे अगमन झाले.

मंगळवारी सकाळी लातूर हुन छत्रपती संभाजीनगर कडे या यात्रेने प्रस्थान केले या यात्रेला आमदार बच्चू कडू यांनी हिरवा झेंडा दाखवून छत्रपती संभाजीनगर कडे रवाना केले. आमदार बच्चू कडू यांनी मराठवाडा जनता विकास परिषदेचे पदाधिकारी यांना आश्वासन दिले की मराठवाडा स्वाभिमान जागर यात्रा बाबत संपूर्ण सहकार्य करू व मराठवाडा अनुशेषाचा लढा तीव्र करण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.

यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य सोमनाथ रोडे , एडवोकेट . व्यंकट बेद्रे , माजी उपनगराध्यक्ष मोईज भाई शेख, आयोजक नामदेवराव पाटील, शिवसेनेचे नेते वंगे , शहराध्यक्ष जयप्रकाश दगडे व मराठवाडा जनता विकास परिषदेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते

# लातूर शहर मनपा प्रदूषण नियंत्रण समितीवर निवड झाल्याबद्दल सुपर्ण जगताप यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार



लातूर :- लातूर शहर मनपा प्रदूषण नियंत्रण समितीवर सदस्य म्हणून सह्याद्री देवराई प्रकल्प उभारणारे वृक्षप्रेमी सुपर्ण जगताप यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडी बद्दल राष्ट्र सेवा दल, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मराठवाडा जनता विकास परिषद, शिक्षकेत्तर संघटना अशा विविध पुरोगामी संघटनाच्या वतीने आज सुपर्ण जगताप यांचा सत्कार करण्यात आला. सुपर्ण जगताप हे मागील २० वर्षापासून पर्यावरणाच्या क्षेत्रात कार्य करत आहेत. त्यांच्या निवडीबद्धल मजविपचे नूतन अध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, सचिव प्रा. अर्जुन जाधव, अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे, मोईजभाई पठाण, ऍड.भाई उदय गवारे, जयप्रकाश दगडे, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, प्रकाश घादगीने, डॉ.गणेश गोमारे, विश्वभार भोसले, ऍड. व्यंकट बेद्रे, ऍड. रवी जाधव, डॉ. बी. आर. पाटील, विश्वनाथ कोळसुरे, ऍड. गोविंद सिरसाट, एस. बी. पळस्कर आदींनी सुपर्ण जगताप यांचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या. २०११ ते १३ मध्ये त्यांनी दयानंद सभागृहात प्लास्टिक विरोधी माझं लातूर स्वच्छ लातूर - माझं लातूर हरित लातूर हे अभियान राबवले. यामध्ये दिलीपराव देशमुख, पोलीस उपाधीक्षक तिरुपती काकडे, वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ दिप्ती डोणगावकर, उपजिल्हाधिकारी बप्पा थोरात, तहसीलदार महेश सावंत ,अतुल देऊळगावकर, सतीश नरहरे , हे सर्व सहभागी झाले होते. त्यावेळी ५ जुनं २०१२ पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाने त्यांचा व सहका-यांचा राज्य पुरस्कार २५ हजार रोख व स्मृतीचिन्ह देऊन गौरव केलेला आहे. २०१५ रोजी सर्वात प्रथम लातूर वृक्ष चळवळ सुरू केली ज्यामुळे आज लातूर हरितमय झाले आहे. ही मुख्य संकल्पना व सुरुवात सुपर्ण जगताप यांनी केली. नंतर सह्याद्री देवराई सोबत लातूर जिल्ह्यात वन विभागाच्या सोबत एक सह्याद्री देवराई हा प्रकल्प तीन बोडक्या डोंगरावर उभा केला. अनेक दुर्मिळ वनस्पती संवर्धन, बीज महोत्सव, चला सावली पेरुया या सारखे उपक्रम मराठवाड्यात राबवले. लातूर शहर फेरीवाला धोरण समिती, व लातूर शहर वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्य म्हणून सद्या ते कार्यरत आहेत

# ब्राह्मण समाजाच्या इतर मागण्यांसाठी पाठपुरावा करणार - धनंजय कुलकर्णी

मुंबई/प्रतिनिधी :- समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीने बदलापूर येथे राज्य समन्वयकांची बैठक घेण्यात आली.या बैठकीमध्ये ब्राह्मण समाजासाठी आता पर्यंत संघर्ष समितीच्या माध्यमातून अमृत परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे तसेच एथड इ डब्ल्यू एस आरक्षण वेद भूषण ला दहावी व वेद विभूषण बारावीचा दर्जा देण्यात आला असून वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करून घेण्यात याव्यात यासाठी अशा काही मागण्या मान्य झाल्या असल्या तरी अजूनही ब्राह्मण समाजावर उठ सूट कोणीही टीका करतो यासाठी ब्राह्मण संरक्षण कायदा बनवण्यात यावा तसेच केजी टू पी जी शिक्षण मोफत करण्यात यावे प्रत्येक जिल्ह्यात ब्राह्मण समाजातील मुला-मुलीं साठीवस्तीगृह करण्यात यावे पुरोहितांना मासिक पाच हजार रुपये मानधन देण्यात यावे यासाठी पुन्हा संघर्ष समिती पाठपुरावा करेल असे संघर्ष समितीच्या बैठकीत ठरवण्यात आले परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले हे देखील या बैठकीत उपस्थित होते त्यांनी आर्थिक विकास महामंडळातून ब्राह्मण समाजासाठी गरजूना प्रामाणिकपणे मदत करू अशी आश्वासन देण्यात आले यावेळी संघर्ष समितीचे संस्थापक धनंजय कुलकर्णी,श्रीकांत जोशी,ईश्वर दीक्षित, अर्चना सरूडकर, अशोक वाघ आदी उपस्थित होते. रविवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी क्लब हाऊस प्रसादम बदलापूर येथे समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीची बैठकघेण्यात आली यामध्ये ब्राह्मण समाजाच्या मागण्या साठी मागील अनेक वर्षापासून केलेल्या संघर्षाला पण म्हणून परशुराम आर्थिक विकास महामंडळ तसेच अमृत शिक्षण प्रशिक्षण संस्था ही देण्यात आली असली तरी अजूनही ब्राह्मण समाजाच्या अनेक समस्या तशाच आहेत



यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे संस्थापक धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले तसेच वेळ पडल्यास पुन्हा आंदोलन करून असे दीपक रणनवरे यांनी सांगितले यावेळी कॅप्टन आशिष दामले परशुराम आर्थिक विकास महा मंडळाचे अध्यक्ष यांचा सत्कार संघर्ष समिती च्या वतीने करण्यात आला तसेच परशुराम आर्थिक विकास मंडळा कडून ब्राह्मण समाजा तील गरजूंना लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.यावेळी बोलताना कॅप्टन अशीष दामले यांनी सांगितले की, परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली आहे त्या दोन महिन्यात महामंडळाचे लाभार्थी तयार होते यामध्ये व्यवसायासाठी १५ लाखापर्यंत व्याज परताव्याची योजना असेल देशांतर्गत शिक्षणासाठी दहा लाखापर्यंत कर्ज व्याज परतावा योजना आहे. परदेशात शिक्षणासाठी २० लाख रुपयापर्यंत व्याज परतावा योजना आहे,गट कर्ज ५० लाख रुपयापर्यंत असेल तसेच इतरही योजना आहेत ब्राह्मण समाजा तील गरजूंना आर्थिक विकास महामंडळा कडून कर्ज मंजूर झाल्यानंतर बँकांनी कर्ज द्यावे यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आलेली असून नवउद्योजकांना नक्कीच कर्ज मिळेल असेही त्यांनी सांगितले पुरोहीतांना मानधनाचा विषय यासाठी काय करता येईल हे नक्कीच विश्वास पूर्ण माहिती घेऊन पुढे कार्य केले जाईल इतरही जे मुद्दे आहेत ते ब्राह्मण समाजातील समस्या सोडवण्यासाठी असल्यामुळे आपण आपल्या परीने प्रामाणिकपणे व निस्वार्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन कॅप्टन आशिष दामले यांनी दिला.यावेळी मकरंद कुलकर्णी परभणी, पाटील साहेब पूर्णा, अनिल दीक्षित धुळे, उदय जोशी नंदुरबार, महेश अकोलकर,राहुल कुलकर्णी,विवेक बाभुळगावकर अंबाजोगाई धाराशिव येथील शिवराज आचार्य व त्यांचे सहकारी जालना येथील मधुसूदन दंडारे,संजय देशपांडे,महेश भालेराव, प्रज्ञा भिडे दादर, अविनाश समुद्रे ठाणे यांच्यासह अनेक राज्यस्तरीय सदस्य समन्वयक उपस्थित होते. दि.१२ ऑक्टोबर रोजी परशुराम लोटे येथे भगवान परशुराम यांचे चरणी नतमस्तक होऊन समस्त ब्राह्मण समाजाच्या इतर मागण्यांसाठी निश्चित पणे सरकार समोर मागण्या ठेवून मान्य करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील पाठपुरावा केला जाईल तसेच वेळ पडल्यास आंदोलनही केले जाईल असा ठराव या बैठकीत घेण्यात आला.

# 'जागेवरच निवड संधी' या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी

लातूर :- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी अर्थात प्लेसमेंट ड्राईव्हचे १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना यामध्ये सहभागी होता येणार आहे इच्छुक उमेदवारांनी १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इत्यादीच्या पाच प्रतीसह उपस्थित रहावे, असे अवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

### वारंवार केस गळून टक्कल पडेल अशी भीती वाटते? मग सकाळी उठल्यानंतर नियमित करा 'या' प्रोटीनयुक्त लाडूचे सेवन

वातावरणात होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो, त्याप्रमाणेच त्वचा आणि केसांवर सुद्धा दिसून येतो. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये केसांमध्ये कोंडा होणे, केस गळणे, सतत खाज येणे, टाळूवरील इन्फेक्शन इत्यादी अनेक गोष्टींचा धोका वाढतो. याशिवाय आठवड्यातून दोनदा केस व्यवस्थित स्वच्छ न केल्यामुळे केसांना हानी पोहचण्याची शक्यता असते. केसांच्या समस्या वाढू लागल्यानंतर महिला दुर्लक्ष करतात. केस गळण्यास सुरुवात झाल्यानंतर वेगवेगळे शॅम्पू किंवा हेअर केअर प्रॉडक्ट वापरले जातात. पण केमिकलयुक्त हेअर केअर प्रॉडक्टचा वापर केल्यामुळे केस आणखीनच खराब होऊन जातात. केसांच्या मुळांना योग्य पोषण न मिळाल्यामुळे केस अतिशय निस्तेज होऊन जातात.

# लातूर कॉँग्रेसचे महानगरपालिकेला निवेदन

लातूर :- लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने अहिल्यादेवी होळकर चौक ते जिवाजी महाले चौक या बाह्य वळण रस्त्याच्या दुतर्फा नाली नसल्यामुळे पावसाळ्यात पाणी साचून नागरिकांना होत असलेल्या त्रासावर लक्ष वेधले आहे. याबाबत त्यांनी लातूर महानगरपालिका आयुक्तांना एक निवेदन सादर केले आहे. निवेदनानुसार, रस्त्याच्या दुतर्फा नाली नसल्याने पावसाचे पाणी रिंगरोड परिसरातील नागरिकांच्या घरांमध्ये शिरते. यामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. स्थानिक नागरिकांनी याबाबत अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केलेली नाही. तसेच, गावाकडून येणारे नैसर्गिक नाले बंद झाल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाला आहे, ज्यामुळे जुन्या नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहाची पुनर्स्थापना करणे गरजेचे असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. अभय साळुंके आणि लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी प्रशासनाला या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे. तसेच यावेळी शहरांमध्ये पावसामुळे रस्त्याची चाळणी झाली असून शहरातील रस्त्यावरील खड्डे तात्काळ बुजवण्यात यावेत. गाव भागातील हनुमान चौक ते सिद्धेश्वर चौक हा रस्ता नव्याने करण्यात यावा, गोसावी समाज आणि बक्कर खाटीक समाज यांच्याकरिता दफनभूमीची व्यवस्था करावी



अशा मागण्याही महापालिका आयुक्तांना करण्यात आल्या. यावेळी दगडू आप्पा मिटकरी, गोरोबा लोखंडे, पप्पू देशमुख, नागसेन कामेगावकर, इमरान सय्यद.प्रा. प्रवीण कांबळे, असिफ बागवान, अड.फारुक शेख, सुंदर पाटील कवेकर,अड.विजय गायकवाड, सुरेश चव्हाण,सहदेव मस्के,व्यंकटेश पुरी, विजय कुमार साबदे, शरद देशमुख, सत्यवान कांबळे, जी ए गायकवाड, भ्याळे भैया, यशपाल कांबळे, राहुल डुमणे, किरण बनसोडे, विजय टाकेकर,संजय ओव्हाळ, पवन कुमार गायकवाड, राजू गवळी, बब्रूवान गायकवाड, अड.अंगद गायकवाड, विष्णू धायगुडे, बालाजी गवळी, सचिंद्र कांबळे,पवन बनसोडे, दयानंद कांबळे, मंगेश वैरागे, आकाश मगर, पिराजी साठे, शितलताई मोरे, करूनाताई शिंदे, आशाताई मस्के यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वतःच्या फायद्यासाठी देहविक्री करून घेणाऱ्या एक महिलेस अटक व तीन पीडित महिलांची सुटका

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई

लातूर :- स्वतःच्या फायद्यासाठी देहविक्री करून घेणाऱ्या एक महिलेस अटक व तीन पीडित महिलांची सुटका अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई*

याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील अधिकारी यांना गोपनीय माहिती मिळाली की, हरंगुळ शेत शिवार मांजरा रेल्वे गेट जवळ एक महिला ही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरिल स्त्रियांना बोलावून घेऊन स्वतःचे राहते घरी त्यांच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत आहे.

सदर माहितीची खातरजमा केल्यानंतर सदरची बाब खरी असल्याचे निदर्शनास येताच दिनांक १४/०९/२०२५ रोजी पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री.मंगेश चव्हाण, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक, श्री.अशोक अनंत्रे पोलीस नियंत्रण कक्ष लातूर व सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके यांच्या नेतृत्वात एएचटीयु पथकाने बनावट ग्राहक पाठवून मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून ती खरी असल्याचे निदर्शनास येताच भाग्यश्री अपेट, हिचे राहते घरी हरंगुळ शेत शिवार मांजरा रेल्वे गेट बार्शी रोड,लातूर येथे छापा मारला.

त्याठिकाणी वेश्या व्यवसाय करीता बोलावलेल्या तीन पिडीत महिला व वेश्या व्यवसाय करून घेणारी एक महिला मिळून आले.

सदर महिला लातूर शहरातील इतर महिलांना घरी बोलावून घेऊन सदर पिडीत महिलांकडून स्वतःच्या फायद्यासाठी स्वत:चे घरी ठेवून त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेते व सदर पीडित महिलांना काही रक्कम देते.

सदर प्रकारा बाबत पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर ७०५/२०२५ कलम १४३ भारतीय न्याय संहिता व ३, ४, ५ स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून कुंटणखाना चालवणारी महिला हिस अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक मा.श्री.अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री.मंगेश चव्हाण, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री.अशोक अनंत्रे पोलीस नियंत्रण कक्ष लातूर, सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके, पोलीस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, सुधमाती यादव, लता गिरी, निहाल मनियार सर्व ने. आनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पथकाने केली आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक समाधान चवरे करीत आहेत.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर जिल्हा दौरा

लातूर :- राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे १६ ते १८ सप्टेंबर या तीन दिवसांच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. पालकमंत्री श्री. भोसले यांचे सातारा येथून १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता लातूर जिल्ह्यात आगमन होईल व औसा तालुक्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राची ते पाहणी करतील. सायंकाळी ६ वाजता त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व मुक्काम करतील. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांसाठी पालकमंत्री श्री. भोसले यांचे १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८.४६ वाजता लातूर येथील हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे आगमन होईल. याठिकाणी सकाळी ९ वाजता त्यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन होईल. सकाळी १० वाजता लातूर तालुक्यातील निवळी येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. लातूर शहरातील गंजगोलाई येथे सकाळी ११ वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला पालकमंत्री उपस्थित राहतील. सकाळी ११.४० वाजता त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. याच ठिकाणी दुपारी १.४५ वाजता त्यांच्या उपस्थितीत लातूर



जिल्ह्यातील गोधन खरेदी विक्री व वाहतुकीबाबत बैठक व त्यानंतर अतिवृष्टीबाबत संबंधित शासकीय विभागांची आढावा बैठक होईल. पालकमंत्री श्री. भोसले यांच्या उपस्थितीत दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात लातूर जिल्हा नियोजन समितीची बैठक होईल. सायंकाळी ५ ते ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय येथे राखीव. सायंकाळी ५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून उदगीर तालुक्यातील हंडरगुळी (बाजार) कडे प्रयाण करतील. हंडरगुळी येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सायंकाळी ६.१५ वाजता पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत अनावरण होईल. सायंकाळी ७.४० वाजता हंडरगुळी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष बालाजी विनायकराव भोसले यांच्या निवासस्थानी भेट देतील. त्यानंतर सोयीनुसार लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. १८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता पालकमंत्री श्री. भोसले लातूर शासकीय विश्रामगृह येथे स्थानिक पदाधिकाऱ्यांसमवेत चर्चा करतील. सकाळी १० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथून साताराकडे प्रयाण करतील.

# शहर जिल्हा भाजपच्या सेवा पंधरवाडा अभियानाचा पालकमंत्र्याच्या उपस्थितीत आज शुभारंभ

लातूर / प्रतिनिधी :- जगातील लोकप्रिय नेते तथा देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहर जिल्हा भाजपच्या वतीने दि. १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांच्या सुचनेनुसार सेवा पंधरवाडा अभियान राबवण्यात येणार आहे.

या अभियानाचा शुभारंभ आज म्हणजेच दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराने होणार आहे. या कार्यक्रमास शहर जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शहर जिल्हा भाजपाचे जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

सेवा परमो धर्म या मंत्रानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून गरीब, शोषित, वंचित यांच्या विकासासाठी कार्य करून विकसित भारताचा संकल्प केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी जयंती पर्यंत म्हणजेच दि ०२ ऑक्टोबर पर्यंत भाजपच्या वतीने सेवा पंधरवाडा अभियान आयोजित करण्यात आलेले आहे. या अभियानाच्या माध्यमातून लातूर शहरात स्वच्छता अभियान, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, वृक्षारोपण, तसेच दिव्यांग व अन्य प्रतिभावान व्यक्तींचा सन्मान, प्रबुद्ध नागरीक संमेलन, विकसित भारत चित्रकला स्पर्धा, नमो मॅरेथॉन आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर पंतप्रधान मोदी यांच्या जीवनावर आधारित प्रदर्शनी व त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाशित झालेल्या पुस्तकांचे वाटप, स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष मेळावे व वोकल फॉर लोकल या संकल्पनेचा प्रचार करण्यात येणार आहे.

या अभियानातील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी शहर जिल्ह्यासह आठही मंडलासाठी संयोजन समिती गठीत केलेली आहे. त्याचबरोबर प्रत्येक कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांना जबाबदारी देण्यात आलेली आहे.

या सेवा पंधरवाडा अभियानाचा शुभारंभ दि १७ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उपस्थितीत गंजगोलाई परिसरात रक्तदान शिबिराने होणार आहे. तसेच यावेळी जगदंबा देवीची महाआरती, स्वच्छता अभियान होणार आहे. या विविध कार्यक्रमांमध्ये शहर जिल्हा भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्यासह अभियान संयोजक अमोल गित्ते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे यांनी केले आहे.

## प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर वाहतूकदारांचे बेमुदत साखळी उपोषण : उपोषणाचा दुसरा दिवस




लातूर : प्रादेशिक परिवहन कार्यालयात अधिकाऱ्यांकडून होत असलेला मनमानी कारभार आणि सर्वसामान्य वाहतूकदारांची होत असलेली आर्थिक लूट या विरोधात वारंवार निवेदने देऊनही कसलीच कारवाई होत नसल्याने लातूर जिल्हा युवा मोटार मालक चालक संघ आणि निर्भय महाराष्ट्र पार्टी, लातूर यांच्या वतीने कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषण आंदोलन सुरू आहे. गेल्या ७ महिन्यापासून कार्यालयात होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत संघटनेच्या वतीने निवेदने देण्यात आली मात्र प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी याची कसलीही दखल घेतली नाही असा गंभीर आरोप करीत हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. बेमुदत साखळी उपोषणाचा आजचा दुसरा दिवस असून १५ सप्टेंबर २०२५ रोजी निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलनाला सुरुवात झाली. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत उपोषण सुरूच राहील असा पवित्रा उपोषण कर्त्यांनी घेतला आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण रजेवर असल्याने आंदोलनकर्त्यांचे निवेदन प्र. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांनी स्वीकारले. या साखळी उपोषण आंदोलनात जितेंद्र भावे, ड. सैफ कोतवाल, संदीप पाटील, इनायत सय्यद, विलास लंगर, सचिन मोटे, वेदप्रकाश भुसनुरे, माधव सूर्यवंशी, अमोल शिंदे, ड. सचिन बोरगावकर, सोमनाथ मेदगे यांचा सहभाग आहे.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील ०३ आरोपीना ०१ लाख ५९ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अटक.

**घरफोडीचे तीन गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.**




लातूर :- घरफोडीच्या गुन्ह्यातील ०३ आरोपीना ०१ लाख ५९ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अटक. घरफोडीचे तीन गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची

याबाबत थोडक्यात माहिती की, काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बंद घरचा कडीकोंडा तोडून आत मध्ये प्रवेश करून सोन्या चांदीचे दागिन्याची चोरी केल्याची घटना घडल्या होत्या. त्यावरून विविध पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता .

पोलीस अधीक्षक अमोल तांबे ,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना सदरच्या पथकाला बंद घराचे कडीकोंडा तोडून चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक ११ सप्टेंबर रोजी पथकाने गरुड चौक परिसरातून तीन आरोपींना ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव

सुमित दगडू गर्गेवाड वय २६ वर्ष राहणार सिद्धेश्वर नगर मळवटी रोड लातूर आकाश उर्फ भावड्या बाबुराव कांबळे वय २५ वर्ष राहणार सिद्धेश्वर नगर मळवटी रोड लातूर, नरसिंग व्यंकट दिवे वय ३५ वर्ष राहणार नाथ नगर मळवटी रोड लातूर.

असे असल्याचे सांगितले. त्याची झडती घेतली असता त्याच्या जवळ त्यांनी चोरी केलेले सोन्याचांदी चे ०१ लाख ५९ हजार ९१० रुपये किमतीचे दागिने मिळून आले.

सदरचा मुद्देमाल पोलीस ठाणे अहमदपूर उदगीर ग्रामीण व चाकूर हद्दीमधील बंद घराचे कडी कोंडे तोडून चोरी केल्याचे नमूद आरोपींनी कबूल केले आहे. त्यावरून अहमदपूर उदगीर ग्रामीण व चाकूर येथील प्रत्येकी एक असे एकूण घरफोडी चे तीन गुन्हे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

नमूद आरोपींना त्यांनी चोरलेल्या मुद्देमालासह पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे अहमदपूर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार संजय कांबळे, रामलिंग शिंदे, माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, सूर्यकांत कलमे, तुराब पठाण, तुळशीराम बरुरे, पाराजी पुट्ठेवाड, गणेश साठे, श्रीनिवास जांभळे यांनी केली आहे.

# शेतकरी दांपत्य व माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते तावरजा प्रकल्प जलपूजन संपन्न

**प्रकल्पाची दुरुस्ती करून बारमाही पाणी उपलब्ध करून दिल्या बद्दल ग्रामस्थांकडून धिरज देशमुख यांचे आभार**



लातूर :-- लातूर ग्रामीण मधील तावरजा प्रकल्पाची दुरूस्तीचे काम पूर्णत्वास आले व हा प्रकल्प प्रथमच पूर्ण क्षमतेने भरला आहे. याचे औचित्य साधून धिरज विलासराव देशमुख तसेच श्री व सौ. नामदेव शिंदे (सावरगाव),श्री व सौ. अंबादास कदम (लखनगाव),श्री व सौ. बब्रुवान मोरे (धानोरी), श्री व सौ. नानासाहेब सूर्यवंशी (उटी खु.)श्री व सौ. काशिनाथ खराबे(उटी बू.) यांच्या हस्ते सपत्नीक जलपूजन संपन्न झाले.


तावरजा प्रकल्पाचे दरवाजे नादुरुस्त असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात होते.लातूर ग्रामीणचा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर काही महिन्यातच धिरज विलासराव देशमुख यांनी महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून तत्कालीन पालकमंत्री अमित विलासराव देशमुख, तत्कालीन मंत्री जयंत पाटील यांच्या सहकार्याने ४२ कोटींचा निधी मंजूर करून घेतला व तावरजा प्रकल्प दुरुस्तीच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात करून दिली आता प्रकल्पाची दुरुस्ती झाल्याने मोठ्या प्रमाणात वाहून जाणाऱ्या पाण्याचा संचय होत आहे. चालू वर्षी पाऊस चांगला झाल्याने तावरजा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे सर्वांसाठी हा क्षण स्वप्नपूर्तीचा असल्यामुळे ग्रामस्थ आनंदी व समाधानी आहेत बारमाही पाणी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थांनी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे आभार व्यक्त केले आहेत. जल पूजन प्रसंगी आपल्या मनोगतात प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते, माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, कोणत्याही भागाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर तिथे सिंचनाची कामे मोठ्या प्रमाणात व्हायला हवीत. हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी सिंचनाच्या कामांना प्राधान्य दिले होते. तोच विचार अंगीकारून आपण राजकीय वाटचाल करत असून तावरजा प्रकल्पाची दुरुस्तीसाठी जे काही प्रयत्न करता आले त्यातून शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. पूर्ण क्षमतेने पाणी साठवले जाणार असल्याने शेतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. भविष्यात देखील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी जे काही करणे शक्य आहे ते निश्चितपणे करत राहू असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. यावेळी २१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, विलास कारखाना माजी व्हा चेअरमन रविंद्र काळे,उपअभियंता नितीन पाटील, ओम थोरमोटे, नागेश तोंडारे, मदन भिसे, भैरवनाथ सुर्यवंशी, नवनाथ काळे, महेश सुर्यवंशी, श्रीनिवास शेळके,सदाशिव कदम, रसुल पटेल,रामदास सुर्यवंशी,महेंद्र मुळे,रामराव ढगे,नानासाहेब जाधव,सचिन शिंदे,दिनकर सुर्यवंशी,अनिल पाटील, दयानंद बिडवे, डॉ दिनेश नवगिरे, रामानंद जाधव, गणेश ढगे आदींची उपस्थिती होती.

# लातूर येथील रेश्मा भवरे यांची महिला समन्वयक पदावर फेरनिवड



लातूर :- बँक ऑफ महाराष्ट्र,शाहू चौक लातूर येथील लिपिक रेश्मा भवरे यांची बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाईज युनियन औरंगाबाद विभागाच्या महिला समन्वयकपदी फेरनिवड झाली आहे,त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाईज युनियन औरंगाबादचे रविवारी १४ वै त्रैवार्षिक अधिवेशन पार पडले.यावेळी युनियनच्या नवीन पदाधिकार्यांची निवड झाली करण्यात आली,त्यावेळी लातूर येथील शाहू चौक शाखेतील कर्तव्यदक्ष लिपीक रेश्मा भवरे यांच्या मागील कार्याची दखल घेवून,त्यांची बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाईज युनियन औरंगाबाद महिला विभाग समन्वयक पदावर पुश्नच निवड केल्याचे जाहीर करण्यात आले.रेश्मा भवरे यांच्या या निवडीचे बँक कर्मचार्यांसह शाहू चौक शाखाधिकारी निखिल पाथरकर, कर्मचारी उदय मोरे, प्रवीण जाधव, गणेश बी.,संकेत धुमाळ,माजी कर्मचारी मिलींद गायकवाड,बँक कर्मचारी,तसेच ऍड.विक्रांत शंके,हरी गोटेकर आदिंनी अभिनंदन केले आहे.

# श्री स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सुरक्षेचे धडे



लातूर/प्रतिनिधी: सध्याच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षा ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाअंतर्गत श्री स्वामी विवेकानंद ज्युनियर कॉलेज, लातूर येथे सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात पार पडली. हा उपक्रम मागील तीन वर्षांपासून लातूर जिल्ह्यात सातत्याने राबविला जात असून विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत जागृती निर्माण करणे हा त्यामागील प्रमुख हेतू आहे. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य व जबाबदारीने वापर करण्यासाठी आवश्यक खबरदारीची माहिती या कार्यशाळेत देण्यात आली. या कार्यशाळेत राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, इंटरनेटच्या अति व अयोग्य वापराचे दुष्परिणाम, तसेच डिजिटल फसवणुकीपासून कसे सावध राहावे याविषयी उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन केले. सायबर सेल, गुन्हा नोंदणी प्रक्रिया, राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक (१९३०) आणि सायबर पोर्टल याबद्दल देखील माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी 'सायबर वॉरियर्स' कविता जंगीड व महिमा शिंदे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर जागरूकता, जबाबदार डिजिटल नागरिकत्व, आणि सुरक्षित इंटरनेट वापर याबाबत दृढ संकल्प निर्माण झाला. भविष्यात अशा कार्यशाळांमुळे सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये अधिक वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आर्थिकदृष्टया सबळ होण्यासाठी बौद्ध समाजाने शेअर बाजाराकडे वळावं - शैलेंद्र पवार

मुंबई :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्राचे गाढे शिक्षण घेतले होते आणि आर्थिक बाबींवर त्यांचे महत्वाचे कार्य होते, त्यांनी कोलंबिया विद्यापीठात आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली होती. त्यांचा प्रबंध The Problem of the Rupee: Its Origin and Its Solution (१९२३) आणि The Evolution of Provincial Finance in British India (१९२५) यांमधून त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर सखोल विचार मांडला होता त्यांचे आर्थिक योगदान हे प्रामुख्याने अर्थशास्त्रीय संशोधन, चलन नीती आणि सामाजिक-आर्थिक समानतेवर आधारित होते त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील विषमता कमी करण्याच्या उपाययोजनांवर भर दिला त्यासाठी त्यांनी वयाच्या २६ व्या वर्षी Stock Shares नावाची कन्सल्टन्सी सुरु केली होती परंतु बाबासाहेब दलित समाजातील असल्याने त्यांना शेअर होल्डर्स मिळाले नाही पुढे लंडन येथे जाऊन त्यांनी The Problem of the Rupee: Its जीळसळप and Its Solution हा प्रबंध सादर केला ज्यावर आपल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची निर्मिती झाली ज्याद्वारे आज देशभरातील सर्वच बँका, पतसंस्था, सहकार क्षेत्र आर्थिक व्यवहार सुरू आहेत हे सर्व बाबासाहेबांची देणं आहे परंतु या आर्थिक उलाढालीत बौद्ध समाजाची किती प्रमाणात उन्नती होत आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. आजवर आपल्या नजरेसमोर शेअर बाजार म्हणजे एक जुगार व त्यात पडणे म्हणजे आयुष्य उध्वस्त अस चित्र उभं करण्यात आलं परंतु खरच अस आहे का ? तस असत तर आज गर्भश्रीमंत उद्योगपती, व्यापरीवर्ग, नेते, सेलिब्रिटी, खेळाडू यांनी त्यात गुंतवणूक केली असती का ? बाबासाहेबांच्या प्रबंधावर भारतीय आर्थिक व्यवहाराचा डोलारा उभा असताना आज त्यांचाच समाज आर्थिक उन्नतीपासून वंचीत आहे खर पाहता शेअर बाजार हा आर्थिक विकासाशी जोडलेला आहे. शेअर म्हणजे एखाद्या कंपनीच्या एकूण भागभांडवलाचा (Total Capital) एक लहानसा भाग जेव्हा तुम्ही एखाद्या कंपनीचा शेअर खरेदी करता, तेव्हा तुम्ही त्या कंपनीचे अंशतः मालक (Partial Owner) बनता. कंपनी नफा कमावते तेव्हा तुम्हाला त्या नफ्यातील काही हिस्सा (लाभांश / Dividend) मिळतो आणि जर कंपनीची कामगिरी चांगली झाली तर तुमच्या शेअरची किंमत वाढते, ज्यामुळे तुम्हाला फायदा होतो व आजच्या डिजिटल इंडियामध्ये शेअर बाजारात जोखीम ही अत्यंत कमी आहे काही ठराविक गणित समजून घेतली तर जोखीम विरहित (Risk Free) गुंतवणूक करून मोठा फायदा मिळवता येऊ शकतो म्हणून आर्थिकदृष्टया सबळ होण्यासाठी बौद्ध समाजाने शेअर बाजाराकडे वळाल पाहिजे असे प्रतिपादन शासन प्रमाणित लेखापरीक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी शैलेंद्र शांताराम पवार यांनी बौद्धजन सहकारी संघ आयोजित ऑनलाईन वर्षावास प्रवचन मालिकेचे दहावे पुष्प गुंफत असताना केले. बौद्धजन सहकारी संघ संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक पातळीवर गाव शाखेच्या व मुंबई येथे मुंबई शाखेच्या एकमताने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत चाललेल्या वर्षावास प्रवचन मालिकेद्वारे गावागावात, घराघरात धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे महत्कार्य संघाच्या माध्यमातून करण्यात येत आहे, सदर प्रवचन मालिकेचे दहावे पुष्प बौद्धजन सहकारी संघ मुंबईचे कार्याध्यक्ष दीपक मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet app द्वारे ऑनलाईन पद्धतीने मोठ्या उत्साहात संपन्न झाले, सदर दहावे पुष्पाच्या प्रसंगी बौद्धजन सहकारी संघाच्या वेळंब विभाग क्र. ४ चे अध्यक्ष सुभाष मोहिते व परिवारास पूजेचा मान देऊन त्यांच्या शुभहस्ते पूजाविधी संपन्न करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कार समितीचे सचिव सचिन मोहिते यांनी प्रभावी व लाघवी भाषाशैलीत केले तर अध्यक्षीय भाषणात कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुंबई कार्याध्यक्ष दीपक मोहिते यांनी व्याख्याते शैलेंद्र शांताराम पवार यांनी 'बौद्ध समाज आणि शेअर बाजार' या विषयावर आपले विचार परखडपणे व प्रभावीपणे सौंदहरणासह मांडून आज समाजाला आर्थिकदृष्टया सबळ होण्यासाठी शेअर बाजारात गुंतवणूक करणे किती गरजेचे आहे हे पटवून दिले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले व उपस्थितांचे आभार व्यक्त करीत आपण आजवर जशी साथ दिली ती अशीच कायम राहिली तर अजूनही उत्तमोत्तम कार्यक्रम यशस्वीपणे घेऊन धम्माचा प्रचार व प्रसार घरोघरी करता येईल असे नमूद करीत सर्वांना मंगलकामना दिल्या. सदर कार्यक्रमास आजी-माजी विश्वस्त, आजी-माजी मध्यवर्ती कमिटी, त्यांचे चेअरमन, आजी माजी विभाग अधिकारी, गाव व मुंबई या दोन्ही शाखांतील सर्व सभासद, सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे तसेच वेळंब विभाग क्र. ४ चे अध्यक्ष सुभाष मोहिते परिवार व व्याख्याते शैलेंद्र शांताराम पवार, गाव व मुंबई शाखेचे आजी माजी विश्वस्त, आजी माजी कार्यकारिणी, उपासक, उपासिका, हितचिंतक व उपस्थितांचे आभार मानून संस्कार समितीचे सचिव सचिन मोहिते यांनी कार्यक्रमाची सांगता केली.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE